# प्रेसनोट

दि.२५/०८/२०२३

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहमदनगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | श्रीरामपूर शहर पो.स्टे., जि.अहमदनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७, ७(अ) |
| आरोपीचे नांव व कार्यालय | १) अंकुश सुभाष कडलग, वय–४२ वर्ष धंदा–नोकरी, कालवा निरीक्षक, वर्ग–३, वडाळा उपविभाग अंतर्गत नॉर्दन ब्रांच, सिंचन शाखा, श्रीरामपूर, जि.अहमदनगर<br>२) अनिस सुलेमान शेख, वय–३४ वर्ष, धंदा–शेती (खाजगी इसम) रा.निमगाव खैरी, ता.श्रीरामपूर, जि. अहमदनगर<br>३) संजय भगवान करडे, वय–३८ वर्ष, धंदा–फुल व्यवसाय (खाजगी इसम) रा.मोरगे वस्ती, ता. श्रीरामपूर, जि.अहमदनगर |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | ८५,०००/– रुपये तडजोड अंती ४०,०००/– रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ४०,०००/– रुपये |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, तक्रारदार यांचे सुनेचे नावे महाराष्ट्र शेती विकास महामंडळ यांचे मालकीचे हरेगाव मळा येथील गट नंबर ३ मधील ३१९ एकर शेती दहा वर्षाच्या करार पद्धतीने कसण्यास घेतलेली आहे. तक्रारदार यांनी सदर क्षेत्रापैकी सध्या ६० एकर ऊस लागवड केली होती. सदर शेतीस पाटबंधारे विभागाचे आवर्तनाद्वारे पाणी मिळते त्यास दर तीन महिन्यांनी पाटबंधारे विभागाकडे पाणी पट्टी भरावी लागते. तक्रारदार यांना माहे जानेवारी २०२३ ते मार्च २०२३ या कालावधीत रुपये २६,२८०/– पाणीपट्टी आली होती. सदरची पाणीपट्टी तक्रारदार हे शेती महामंडळाचे हरेगाव येथील कार्यालयात भरतात. महामंडळातर्फे सदर पाणीपट्टी पाटबंधारे विभागास वर्ग केली जाते. तक्रारदार यांचे ६० एकर ऊसाचे क्षेत्र आहे पैकी ३५ एकर क्षेत्रासाठी शेतात असलेल्या विहीर व बोअरद्वारे सिंचन करतात उर्वरित २५ एकर साठी पाटबंधारे विभागाकडून कालव्याचे पाणी घेतात. यातील आरोपी लोकसेवक अंकुश सुभाष कडलग, कालवा निरीक्षक, वर्ग–३, वडाळा उपविभाग अंतर्गत नॉर्दन ब्रांच, सिंचन शाखा, श्रीरामपूर, जि.अहमदनगर यांनी तक्रारदार यांना त्यांचे शेती सिंचनाचे क्षेत्र जास्त असल्याचे सांगून पाटबंधारे विभागामार्फत देण्यात येणारे पाणी अविरत चालू राहू देण्यासाठी एकूण ८५,०००/– रुपये लाच द्यावी लागेल अशी लाच मागणीची तक्रार ला.प्र.वि. अहमदनगर कार्यालयास प्राप्त झाली होती. त्यानुसार दि.०७/०६/२०२३ रोजी लाच मागणी पडताळणी करण्यात आली. लाच मागणी पडताळणी दरम्यान आरोपी लोकसेवक अंकुश कडलग यांनी आरोपी क्रमांक २ अनिस शेख याचे मार्फतीने तक्रारदाराकडे पंचा समक्ष ८५,०००/– रुपये लाचेची मागणी करून तडजोडी अंती ४०,०००/– रुपये लाचेची मागणी केली व फोनवरील संभाषणाद्वारे दुजोरा दिला. आज दि.२५/०८/२०२३ रोजी आरोपी क्रमांक १ अंकुश कडलग याने तक्रारदार यांचे कडून पंचासमक्ष ४०,०००/– रुपये रुपये लाच रक्कम स्वीकारून सदर रक्कम आरोपी क्रमांक ३ संजय करडे याचेकडे हस्तांतरीत केली. तिन्ही आरोपींना ताब्यात घेण्यात आलेले असून त्यांचेविरुध्द श्रीरामपूर शहर पोलीस स्टेशन, जि.अहमदनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत,
टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहमदनगर

संकेतस्थळ :– acbmaharashtra.gov.in

ई–मेल :– acbwebmail@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार
ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक :– १०६४

दुरध्वनी क्रमांक :– ०२४१–२४२३६७७

व्हॉटस अप क्रमांक:– ९९३०९९७७००

(प्रविण लोखंडे)
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
अहमदनगर